अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । गुरुवार

०१.१०.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २४२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## भरधाव मिनी स्कूलबसने भावंडांना चिरडले : भावाचा मृत्यू, बहीण जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – पुण्यात स्कूलबसच्या धडकेत एका १६ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. पुण्यातील घोरपडी परिसरात ही घटना घडली आहे.

राष्ट्रीय युद्ध स्मारक चौकात भरधाव वेगाने जाणाऱ्या मिनी स्कूल बसने दुचाकीवरून जाणाऱ्या भाऊ बहिणीला समोरून धडक दिल्याने दोन भावंडे गंभीर जखमी झाली. नागरिकांनी दोघांनाही तात्काळ रुग्णालयात दाखल केले. अल्पवयीन भावाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर बहिणीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात काल (बुधवारी, ता ३०) सकाळी साडेसातच्या सुमारास घडला आहे रोहित लक्ष्मण कुदळे (वय १६) असे अपघातात मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. तर रिया लक्ष्मण कुदळे (वय १८ ) ही जखमी आहे. मांजरी परिसरातील रहिवासी रिया लक्ष्मण कुदळे स्कूटर चालवत होती. तिचा भाऊ रोहित मागे बसला होता.

दरम्यान वॉर मेमोरियल चौकात भरधाव वेगाने आलेल्या मिनी स्कूल बसने त्यांच्या ॲक्टिव्हाला धडक दिली.या अपघातात रिया आणि रोहित दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. रोहितचा रात्री उशिरा उपचारांदरम्यान मृत्यू झाला आहे. स्कूल बसचालक सागर याने वाहतूक



नियमांकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालविल्याचा आरोप आहे. या प्रकरणी रिया कुदळे हिच्या तक्रारीवरून वानवडी पोलिस ठाण्यात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय युद्ध स्मारक चौकात भरधाव वेगाने आलेल्या एका मिनी स्कूल बसने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिल्याने भाऊ-बहीण गंभीर जखमी झाले. दुर्दैवाने, या अपघातात १६ वर्षीय रोहित लक्ष्मण कुदळे याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर त्याची १८ वर्षीय बहीण रिया लक्ष्मण कुदळे हिच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात बुधवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडला.

## विधानपरिषदेसाठी भाजप-शिवसेना-राष्ट्रवादीत ३:१:१ चा फॉर्म्युला

* मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांमध्ये बैठक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातील पाच जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीच्या जागावाटपावर महायुतीतील प्रमुख नेत्यांमध्ये प्राथमिक सहमती झाल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यात बुधवारी रात्री झालेल्या बैठकीत पाच जागांसाठी ३:१:१ असा फॉर्म्युला निश्चित झाल्याचे समजते. त्यानुसार भाजप तीन जागांवर, तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस प्रत्येकी एका जागेवर निवडणूक लढवणार आहेत. मात्र पुणे शिक्षक मतदारसंघावर भाजप आणि शिवसेनेचा दावा कायम असल्याने एका जागेचा तिढा अद्याप सुटलेला नाही.

### पुणे शिक्षक मतदारसंघात भाजप-शिवसेनेत रस्सीखेच कायम



महायुतीतील घटक पक्षांकडून अधिक जागांची मागणी करण्यात आली होती. मात्र जागावाटपाच्या चर्चेत भाजपला नागपूर पदवीधर आणि पुणे पदवीधर या दोन जागांसह पुणे शिक्षक मतदारसंघ मिळण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला, तर अमरावती शिक्षक मतदारसंघ शिवसेनेला देण्याचे जवळपास निश्चित झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुणे शिक्षक मतदारसंघ कोणाच्या वाट्याला जाणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघासाठी शिवसेनेकडून दावा करण्यात येत असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या जागेसाठी आग्रही असल्याचे सांगितले जाते. दुसरीकडे भाजपनेही या मतदारसंघावरील आपला दावा कायम ठेवला आहे. त्यामुळे महायुतीतील जागावाटपाचा एकमेव तिढा या जागेवर राहिला असून, येत्या काही दिवसांत त्यावर तोडगा काढला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, पाचही जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी व्हावेत, यासाठी निवडणूक रणनीतीवरही बैठकीत चर्चा झाल्याचे सांगण्यात येते. उमेदवारांची निवड, मतदारसंघनिहाय संघटनात्मक तयारी आणि घटक पक्षांमधील समन्वय याबाबत पुढील काळात निर्णय घेतला जाणार आहे.

**पाच मतदारसंघांतील चित्र**

**पुणे पदवीधर**

२०२० विजेते : अरुण लाड (राष्ट्रवादी काँग्रेस), प्रमुख इच्छुक : शरद लाड (भाजप), भैया माने (राष्ट्रवादी काँग्रेस), २०२० मध्ये अरुण लाड यांनी भाजपचे संग्राम देशमुख यांचा पराभव केला होता. यंदा भाजपकडून शरद लाड यांच्या नावाची चर्चा आहे, तर राष्ट्रवादीकडून भैया माने इच्छुक आहेत. पुणे शिक्षक २०२० विजेते : जयंत आसगावकर (काँग्रेस), प्रमुख इच्छुक : मंगेश चिवटे (शिवसेना), सचिन सानप (शिवसेना), कौस्तुभ गावडे (भाजप), नंदकुमार सागर; शिवाजी खांडेकर (राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गट), पुणे शिक्षक मतदारसंघासाठी भाजप आणि शिवसेनेमध्ये महायुतीची उमेदवारी मिळविण्यावरून रस्सीखेच आहे. मंगेश चिवटे यांच्या नावाची शिवसेनेकडून चर्चा असून भाजपकडून सचिन सानप यांचे नाव पुढे आले आहे.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

## 'फ्लायदुबई'च्या विमानात थरार : मुंबईकर कॅप्टन स्मित मच्छार ठरला देवदूत

### जखमी होऊनही वाचवला १७४ प्रवाशांचा जीव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – दुबईहून तेल अवीवला जाणाऱ्या फ्लायदुबईच्या एफझेड१०७३ विमानात बुधवारी (दि.३०) हवेतच थरारक घटना घडली. विमान ३४ हजार फूट उंचीवर असताना सहवैमानिकाने भारतीय आणि मुंबईकर कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर चाकूने हल्ला करून विमानाचे नियंत्रण ताब्यात घेण्याचा आणि ते क्रॅश करण्याचा कथित प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.

या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्यानंतरही कॅप्टन मच्छार यांनी प्रसंगावधान राखत कॉकपिटचा दरवाजा उघडण्यास मदत केली. यादरम्यान



विमानाची उंची काही क्षणांत सुमारे १४ हजार फूटांनी घसरली. त्यानंतर प्रवासी आणि क्रू सदस्यांनी सहवैमानिकाला पकडले, तर विमानातील इतर वैमानिकांनी नियंत्रण मिळवत ते सौदी अरेबियातील तबूक विमानतळावर सुरक्षित उतरवले. विमानातील १७४ प्रवासी सुरक्षित बचावले असून, हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप तपासाधीन आहे.

३४ हजार फुटांवर थरार माहितीनुसार, फ्लायदुबईचे ऋन१०७३ हे विमान दुबईहून तेल अवीवच्या दिशेने जात होते. विमानात १७४ प्रवासी होते. त्यामध्ये २७ मुलांचाही समावेश होता. विमान ३४ हजार फूट उंचीवर असताना कॉकपिटमध्ये कॅप्टन मच्छार आणि सहवैमानिकामध्ये झटापट सुरू झाली. इस्रायली अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सहवैमानिकाने कॅप्टन मच्छार यांच्यावर हल्ला केला आणि विमानावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. या घटनेदरम्यान विमानाची उंची झपाट्याने कमी झाली. फ्लाइट-ट्रॅकिंग डेटानुसार विमानाने सुमारे १४ हजार फूट उंची अवघ्या ३७ सेकंदांत कमी झाली. त्यानंतर, विमानाने आपत्कालीन हस्तक्षेपाचा ट्रान्सपोंडर कोडही प्रसारित केला.

### तहसीलदारांच्या खुर्चीवर खासदार बसले

## निवडणूक आयोगाकडे तक्रार, तहसीलदारांच्या बडतर्फीची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जालना** – राज्यातील निवडणुकांच्या काळात आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी खासदार कल्याण काळे यांच्याविरुद्ध तक्रार करण्यात आली आहे.

जालन्यात निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात परतूर तहसीलदार कार्यालयातील एका प्रकाराची तक्रार करण्यात आली. त्यामध्ये, जालन्याचे खासदार डॉ.कल्याण काळे हे तहसीलदारांच्या अधिकृत




खुर्चीवर बसले आणि त्यांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांना संबोधित करत प्रशासकीय कामावर राजकीय प्रभाव टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीतून तत्कालीन तहसीलदारांवर देखील कारवाईची मागणी करण्यात आलीय. सध्या राज्यातील शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघासाठी निवडणुका जाहीर झाल्या असून संबंधित मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू आहे. त्यामुळे, आचारसंहितेच्या नियमांचं पालन लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांकडून करण्यात यायला हवं. मात्र, आचारसंहितेचं उल्लंघन झाल्याचा आरोप करत तक्रारदार रशीद बागवान यांनी याप्रकरणी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

## एमपीएससी वरील आरोपांची न्यायालयीन चौकशी

### आयोगाच्या सचिवांची बदली होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) विद्यमान आणि माजी अध्यक्ष तसेच सदस्यांच्या विरोधातील आरोपांची तीन महिन्यात न्यायालयीन चौकशी करण्यात येईल. तसेच आयोगाच्या सचिवांची तात्काळ बदली करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी येथे केली.




एमपीएससी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी बहुतांश मागण्या मान्य केल्याने विद्यार्थ्यांनी २ ऑक्टोबरचे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात येत असल्याचे जाहीर केले. निकषांच्या आधारे कारवाई एमपीएससीच्या अध्यक्षांना पदावरून हटविण्याची विद्यार्थी आंदोलकांची मागणी होती. याबाबत फडणवीस यांनी खुलासा केला. एमपीएससी अध्यक्ष हे संवैधानिक पद आहे. त्यांना हटवण्याचा अधिकार राज्य सरकार किंवा राज्यपालांना नाही. सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन राष्ट्रपतींना आयोगाच्या अध्यक्षांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्यामुळे आयोगाचे माजी आणि विद्यमान अध्यक्ष, सदस्य यांच्यावर कारवाईची जी मागणी आहे त्यानुषंगाने तीन महिन्यात न्यायालयीन चौकशी केली जाईल.



# दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीला स्थगिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दुष्काळग्रस्त तालुक्यांतील शेती कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तसेच पीककर्जाचे पुनर्गठन करण्याचे आदेश देण्यात आले असून, ही प्रक्रिया ३० एप्रिल २०२७पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना बँकांना करण्यात आल्या आहेत. पुढील खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करून देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. यंदा अपुऱ्या पावसामुळे राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकारने सुरुवातीला २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला होता. त्यानंतर आणखी ४३ तालुक्यांचा समावेश करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी कर्जवसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीसाठी तगादा लावला जाऊ नये, याबाबत महसूलमंत्री तथा दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सूचना दिल्या आहेत. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या दारी बँक किंवा पतसंस्थेचा कर्मचारी वसुलीसाठी जाता कामा नये, अशा सूचना जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांना देण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. रोजगार हमीच्या माध्यमातून हाताला काम देणार दरम्यान, दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि शेतमजुरांना गावातच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार हमी योजना विभागाने ६ हजार ७२८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्थेची

# ४ वी वार्षिक अधिमंडळाची सर्वसाधारण सभा उत्साहात



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्थेची ३४ वी वार्षिक अधिमंडळाची सर्वसाधारण सभा कोल्हे सभागृहात संस्थाध्यक्ष एन.बी.लोणारे यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली.

या सभेमध्ये सन २०२५-२६ आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल , हिशोब पत्रकाचे नफा-तोटा पत्रकाचे वाचन संस्थेचे व्यवस्थापक एन.टी.बारसागडे यांनी वाचन केले. यावेळी मंचावर उपाध्यक्ष एस.एस.डबरासे, संचालक वासुदेव लांडगे, दिलीप भोयर, भिमराव हरले, हरिश्चंद्र नागदेवे, गणेश मेओलिया, प्रकाश कासोरदे, साहेबराव कांबळे, संचालिका माया पाटील, पुष्पा दुपारे, डॉ.रणधीर घोरपडे, प्रा.डॉ.लुम्बिनी गणवीर उपस्थित होत्या. यावेळी जरुडच्या उत्क्रांती सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक रविंद्र वसुले यांचे 'ग्राहक साक्षरता' या विषयी मार्गदर्शन घेण्यात आले.

संचालन भिमराव हरले तर आभार एच.जे.नागदेवे यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वितेकरीता डी.एम.पाटील, व्हि.डी.भगत, आर.एस.दंडाळे, आर.बी.हरले, ए.एम.वाघ, आय.एस.डोंगरे यांनी सहकार्य केले. स्नेहभोजन घेऊन सभा संपन्न झाली.

# महिला सुरक्षा व गोपनीयतेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

स्वामी विवेकानंद कॉलेज येथील उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – महिला सुरक्षा, वैयक्तिक गोपनीयता तसेच तंत्रज्ञानाचा जबाबदारीने आणि सुरक्षितपणे वापर याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे महाविद्यालयाच्या अंतर्गत समितीच्या माध्यमातून महिला सुरक्षा व गोपनीयता जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.







हा कार्यक्रम राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि तालुका विधी सेवा समिती यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणुन दिवाणी न्यायाधिशव्ही.व्ही.राजूरकर, तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.ए.आर.घाटोळे, सदस्य ॲड.प्रणिता चौव्हाण, पोलीस उपनिरीक्षक मोनिका मांदळे, स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य किशोर तडस यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य किशोर तडस यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगताना विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक आणि सामाजिक जागरूकता निर्माण करणारे असे उपक्रम महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. यानंतर ॲड.ए.आर.घाटोळे यांनी महिला सुरक्षा या विषयावर तर ॲड.प्रणिता चौव्हाण यांनी महिला सुरक्षा तसेच वैयक्तिक गोपनीयता म्हणजे काय? याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. यानंतर व्ही.व्ही.राजूरकर महिला सुरक्षा, कायदेविषयक जागरूकता, वैयक्तिक अधिकार आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे यांचे सूचनेनुसार अंतर्गत समितीच्या समन्वयक प्रा.संजीवनी बारस्कार यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाचे यशस्वि संचालन प्रा.चेतना सावरकर यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील बीबीए विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर, प्रा.आलिया खान, प्रा.साक्षी राठी, प्रा..कविता बेहरे, प्रा.धनश्री खंडार, प्रा.गौरी कुबळे, प्रा.अस्मिता गेडाम तसेच इतर शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आर्थिक विकासात नाशिक चौथ्या क्रमांकावर

औद्योगिक, कृषी आणि आर्थिक केंद्र म्हणून शहराची आर्थिक ताकद वाढली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – औद्योगिक, कृषी आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र म्हणून नाशिक जिल्ह्याची वेगाने वाटचाल सुरू आहे. अभियांत्रिकी, ऑटोमोबाईल, औषधनिर्मिती, अन्नप्रक्रिया, शेती, फलोत्पादन, वाइननिर्मिती, बांधकाम आणि लॉजिस्टिक्स या विविध क्षेत्रांमुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला बळ मिळत आहे. महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा गुंतवणूक शिखर परिषदेत नाशिकमध्ये सुमारे ६,४०४ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे १४२ सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून सुमारे १४,४०३ रोजगारनिर्मितीची क्षमता निर्माण होण्याची शक्यता आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार मुंबई, ठाणे आणि पुण्यानंतर नाशिक ही महाराष्ट्रातील मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक ठरत आहे. २०२४-२५ मध्ये नाशिकच्या सकल जिल्हा देशांतर्गत उत्पादनात १८.२ टक्के वाढ झाल्याचा दावा करण्यात आला आहे. विकासाचा सध्याचा वेग कायम राहिल्यास जिल्ह्याची अर्थव्यवस्था सुमारे २.३४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. ओझर येथील हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेडच्या सुविधेमुळे संरक्षण आणि एअरोस्पेस क्षेत्रालाही नाशिकमध्ये बळ मिळत आहे.

जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात

# 'ग्रंथ हेच आपले सोबती' विषयावर व्याख्यान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संलग्नित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांचा स्मृतिदिन नुकताच विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्त 'ग्रंथ हेच आपले सोबती' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जी.आर.तडस तर प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.डॉ.शशिकांत काळे यांनी महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारकांनी ग्रंथांचे वाचन करुन आपल्या विचारांना दिशा दिली आणि समाजप्रबोधनाचे कार्य केले, असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांनी वाचनामुळे माणुस ज्ञानसमृद्ध होत असून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, असे सांगितले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.रविकांत महिंदकर यांनी विद्यार्थ्यांना डॉ.एस.आर. रंगनाथन यांनी मांडलेल्या ग्रंथालयशास्त्रातील पंचसूत्रांची माहिती दिली. डॉ.राम कुलसंगे यांनी मानव हा मानवाचा सोबती असला, तरी ज्ञानाच्या प्रवासात ग्रंथ हा माणसाचा खरा सोबती असल्याचे सांगितले.

संचालन डॉ.रविकांत महिंदकर तर आभार ईश्वरी बोहरुपी हिने मानले. यावेळी डॉ.विष्णु पडवळ, प्रा.प्रज्ञा निभोरकर, प्रा.पूजा महाले, प्रा.ज्योती मरस्कोल्हे, प्रा.लीलाधर चौधरी, प्रा.प्रदीप आवारे, प्रा.समीक्षा बिडकर, प्रा.सीमा कांदे , प्रा.रुपाली सवई, प्रा.रेणुका वानखडे, प्रा.श्वेता लोखंडे, प्रमोद पाटील, निलेश खुरद, अर्चना राऊत, निलेश बंदे, संतोष चव्हाण यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# 'विकसित भारत २०४७' संकल्पनेवर चित्रकला स्पर्धा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे संकल्प अभियानांतर्गत 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेवर आधारित चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेतून विकसित भारताचे सुंदर व आशयपूर्ण चित्रण केले.





स्पर्धेत उत्कृष्ट चित्रकला सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ शाळेत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक ए. बी. चौधरी, उपमुख्याध्यापक सुरेंद्र देशमुख आणि पर्यवेक्षक प्रमोद केने यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन डी.बी.बारस्कर, एस.एन.मानकर, एच.डी.भुयार आणि एस.व्ही.गजभिये यांनी केले.

विजेत्या विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# राष्ट्राची सेवा हाच एनएसएसचा मुलमंत्र : प्रा.डॉ.शशिकांत काळे

स्व.पंचफुलाबाई पावडे महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा दिन उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) ही विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावाचे संस्कार रुजविणारी चळवळ असून 'राष्ट्राची सेवा हाच एनएसएसचा मूलमंत्र आहे,' असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय समन्वयक प्रा.डॉ.शशिकांत काळे यांनी केले. ते महिला महाविद्यालय येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाची सुरुवात वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि शिक्षणमहर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहारार्पण करुन करण्यात आली. त्यानंतर विद्यापीठ गीत आणि एनएसएसचे लक्ष्यगीत सादर करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.विवेक देशमुख, आचल कांबळे यांनी अध्यक्षांचे, दामिनी देशमुख यांनी प्रमुख अतिथी प्रा.डॉ.शशिकांत काळे यांचे, तर उन्नती उईके यांनी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.अरविंद तट्टे यांचे स्वागत केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.अरविंद तट्टे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ.विवेक देशमुख यांनी एनएसएसचे 'नॉट मी, बट यू' हे घोषवाक्य आत्मसात करुन समाजहितासाठी कार्य करण्याची प्रेरणा स्वयंसेविकांना दिली.

संचालन देवयानी बंगाले तर आभार प्रदर्शन उन्नती उईके यांनी मानले. यावेळी डॉ.अनिल कडू, डॉ.प्रदीप ढोले, डॉ.मनोज राठोड, डॉ.लीना गावंडे, डॉ.फरहिना शिरीन, ग्रंथपाल डॉ.कविता इंगळे आणि प्रफुल्ल किटुकले यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शस्त्रास्त्रांची स्पर्धा आता कुठवर जाणार?

**अमेरिकेने अत्यंत खळबळजनक आणि तितकीच चिंताजनक कबुली देऊन जगाचे टेन्शन वाढवले आहे. मानवी इतिहासातील एका नव्या आणि अधिक धोकादायक युद्धाच्या पर्वाची ती अधिकृत नांदीच आहे.**



मानवाने अंतराळ जिंकण्याचे स्वप्न पाहिले, चंद्रावर पाऊल ठेवले, मंगळावर यंत्रे पाठविली आणि पृथ्वीभोवती हजारो उपग्रहांचे जाळे उभे केले. पण आता अंतराळाकडे पाहण्याची दृष्टी बदलत आहे. अंतराळ संशोधन, दळणवळण आणि हवामानाच्या अभ्यासासाठी असलेले अवकाश हळूहळू लष्करी सामर्थ्याचे नवे रणांगण बनत आहे. अमेरिकेने अंतराळ कक्षेत 'ऑन-ऑर्बिट स्पेस कंट्रोल वेपन्स' तैनात केल्याची केलेली सार्वजनिक घोषणा या बदलाचे गांभीर्य अधोरेखित करणारी आहे. अमेरिकी हवाई दलाचे सचिव ट्रॉय मिंक यांनी ही माहिती दिली; मात्र या शस्त्रांचे स्वरूप, क्षमता किंवा तैनातीची नेमकी वेळ त्यांनी स्पष्ट केलेली नाही.

ही केवळ अमेरिकेची संरक्षणात्मक तयारी आहे की अंतराळातील नव्या शस्त्रस्पर्धेची सुरुवात? हा प्रश्न आता केवळ लष्करी तज्ज्ञांचा राहिलेला नाही. कारण आजची युद्धव्यवस्था उपग्रहांशिवाय जवळजवळ अशक्य आहे. जीपीएस, क्षेपणास्त्रांचे मार्गदर्शन, गुप्तचर माहिती, लष्करी दळणवळण, हवामानाचा अंदाज, ड्रोन संचालन, अचूक लक्ष्यभेदन आणि रणांगणाचे निरीक्षणया सर्वांच्या मुळाशी अंतराळातील उपग्रह आहेत. म्हणजेच भविष्यातील युद्ध पृथ्वीवर सुरू होण्यापूर्वीच अंतराळात सुरू होऊ शकते.

अमेरिका, चीन आणि रशिया गेल्या अनेक दशकांपासून उपग्रहविरोधी क्षमता विकसित करीत आहेत. उपग्रह पाडणारी क्षेपणास्त्रे, इलेक्ट्रॉनिक जॅमिंग, सायबरहल्ले, लेझर, उच्च-ऊर्जा मायक्रोवेव्ह आणि दुसऱ्या उपग्रहाच्या जवळ जाऊन त्याला निष्क्रिय करण्याची क्षमताअशा अनेक प्रकारच्या 'काउंटर-स्पेस' तंत्रज्ञानावर काम सुरू आहे. अमेरिकी स्पेस फोर्सच्या मते चीन आणि रशिया अमेरिकी अंतराळाधारित क्षमतांना विस्कळीत किंवा निष्प्रभ करण्यासाठी विविध काउंटर-स्पेस प्रणाली विकसित करीत आहेत. चीनच्या लष्करी आधुनिकीकरणात अंतराळाला भविष्यातील संघर्षाचा महत्त्वाचा घटक मानले जात असल्याचे अमेरिकी विश्लेषणात नमूद आहे. रशियाच्या बाबतीतही जवळून उपग्रहांच्या हालचाली करणे, लेझर प्रणाली आणि इतर काउंटर-स्पेस क्षमता याबाबत अमेरिकेने चिंता व्यक्त केली आहे.

परंतु येथे एक महत्त्वाचा फरक आहे. अंतराळातील प्रत्येक लष्करी प्रणाली म्हणजे उपग्रह पाडणारे क्षेपणास्त्र असे नाही. भविष्यातील शस्त्रस्पर्धा अधिक सूक्ष्म असू शकते. एखाद्या उपग्रहाला नष्ट न करता त्याची दृष्टी बंद करणे, त्याचे संप्रेषण खंडित करणे, त्याच्या संगणकीय प्रणालीत हस्तक्षेप करणे किंवा त्याची कक्षा बदलणे. ही सुद्धा युद्धातील प्रभावी शस्त्रे ठरू शकतात. म्हणूनच अंतराळातील युद्ध म्हणजे उद्या आकाशात क्षेपणास्त्रांची आतषबाजी होईल, असे सरळ समीकरण नाही. उलट, अदृश्य युद्ध अधिक धोकादायक ठरू शकते.

अमेरिकेने यापूर्वी उपग्रहविरोधी क्षमता प्रदर्शित केली आहे. मात्र कक्षेत तैनात असलेल्या 'स्पेस कंट्रोल वेपन्स'बाबत वरिष्ठ अमेरिकी अधिकाऱ्याने केलेली सार्वजनिक कबुली वेगळी आहे. मिंक यांच्या म्हणण्यानुसार ही शस्त्रे शत्रूच्या कारवायांपासून संयुक्त दलाचे संरक्षण करण्यासाठी आहेत. त्यांच्या स्वरूपाची माहिती मात्र सार्वजनिक करण्यात आलेली नाही. माजी अमेरिकी संरक्षण अधिकाऱ्यांनी अशा प्रणालींमध्ये लेझर, उच्च-शक्ती मायक्रोवेव्ह किंवा शत्रूच्या उपग्रहाला पकडून त्याची कक्षा बदलू शकणाऱ्या उपग्रहांचा समावेश असू शकतो, असे पूर्वी सांगितले होते. यातील एक महत्त्वाची बाब म्हणजे 'लो-डेब्रिस' शस्त्रांवर दिला जाणारा भर. कारण एखादा उपग्रह क्षेपणास्त्राने उडवला तर त्याचे हजारो तुकडे कक्षेत विखुरू शकतात. हे तुकडे इतर उपग्रहांसाठीही प्रचंड धोका निर्माण करू शकतात. अमेरिकेच्या घोषणेनंतर चीनने अंतराळातील शस्त्रस्पर्धेला विरोध केला आणि अमेरिकेने अंतराळात लष्करी शक्ती वाढवणे थांबवावे, अशी भूमिका मांडली. रशियानेही अंतराळाचे शस्त्रमुक्तीकरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहमतीची गरज व्यक्त केली. परंतु येथे जागतिक सुरक्षेतील नेहमीचा विरोधाभास दिसतो. एकीकडे प्रत्येक महासत्ता अंतराळाच्या शांततापूर्ण वापराची भाषा करते; दुसरीकडे प्रत्येकजण भविष्यातील संघर्षासाठी अंतराळातील आपली क्षमता वाढवत आहे. यातूनच 'सुरक्षेसाठी शस्त्रसज्जता' आणि 'शस्त्रसज्जतेमुळे निर्माण होणारी असुरक्षा' यांचे दुष्टचक्र सुरू होते.

आज उपग्रहांचे संरक्षण हा विषय आहे. उद्या कक्षेतून क्षेपणास्त्रांचा मागोवा घेणे आणि त्यांना अडवणे हा विषय असेल. त्यानंतर अंतराळातूनच आक्रमक क्षेपणास्त्र किंवा इतर प्रणाली वापरण्याचा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. अमेरिकेच्या 'गोल्डन डोम' क्षेपणास्त्र संरक्षण संकल्पनेत अंतराळाधारित इंटरसेप्टरचाही विचार केला जात आहे. या संकल्पनेचा उद्देश क्षेपणास्त्रांच्या धोक्यापासून अमेरिकेचे संरक्षण करणे हा आहे.

अंतराळातील युद्धाची सर्वात भीषण बाब म्हणजे त्याचे परिणाम केवळ दोन देशांपुरते मर्यादित राहणार नाहीत. समजा एखाद्या संघर्षात मोठ्या संख्येने उपग्रह नष्ट झाले. त्यातून निर्माण झालेला अवकाशीय कचरा इतर उपग्रहांवर आदळू शकतो. अशा प्रकारची साखळी प्रतिक्रिया निर्माण झाल्यास पृथ्वीभोवतीची काही कक्षा दीर्घकाळ वापरण्यायोग्य राहणार नाही, अशी भीती व्यक्त केली जाते. याचा परिणाम मोबाइल दळणवळणापासून विमान वाहतूक, जहाज वाहतूक, इंटरनेट, हवामान अंदाज आणि लष्करी संप्रेषणापर्यंत सर्वत्र होऊ शकतो.

या बदलाकडे भारताला अत्यंत गांभीर्याने पाहावे लागेल. भारताची अंतराळ क्षमता वेगाने विस्तारत आहे. दूरसंचार, नेव्हिगेशन, हवामान, कृषी, आपत्ती व्यवस्थापन, सीमाव्यवस्थापन आणि संरक्षण या सर्व क्षेत्रांसाठी अंतराळ महत्त्वाचे होत आहे. विशेषतः चीनच्या वाढत्या अंतराळ क्षमतेच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी सुरक्षित, लवचिक आणि पर्यायी अंतराळ पायाभूत व्यवस्था आवश्यक ठरते. युद्धाच्या परिस्थितीत एखादा उपग्रह निकामी झाला तरी संपूर्ण व्यवस्था ठप्प होऊ नये, यासाठी अनेक उपग्रहांचे जाळे, सुरक्षित संप्रेषण, जमिनीवरील पर्यायी प्रणाली आणि काउंटर स्पेस धोक्यांचा सामना करण्याची क्षमता विकसित करणे महत्त्वाचे ठरेल. पण त्याच वेळी भारताने अंतराळाला केवळ शस्त्रस्पर्धेचे क्षेत्र बनविण्याऐवजी जबाबदार अंतराळ शक्ती म्हणून आपली भूमिका मजबूत करणेही आवश्यक आहे.

आज अमेरिका म्हणते की, आम्ही संरक्षणासाठी सज्ज आहोत. चीन म्हणतो की, अमेरिका शस्त्रस्पर्धा वाढवत आहे. रशिया म्हणतो की, अंतराळ शस्त्रमुक्त असावे. पण या सर्व वक्तव्यांच्या पलीकडे प्रत्यक्षात तिन्ही महासत्ता आपापली क्षमता वाढवत आहेत. याच विरोधाभासात भविष्यातील संकट दडले आहे.

अंतराळात शस्त्र ठेवणे सोपे असू शकते; पण तेथे युद्ध सुरू झाल्यावर ते थांबवणे अत्यंत कठीण असू शकते. म्हणूनच आज प्रश्न केवळ 'कोणाकडे किती शक्तिशाली अंतराळशस्त्रे आहेत?' हा नसावा. खरा प्रश्न असा असायला हवाङ्गमानवजातीला अंतराळात शस्त्रस्पर्धेची मर्यादा आखता येईल का? कारण शस्त्रास्त्रांची स्पर्धा जर जमिनीवरून आकाशात, आकाशातून अंतराळात आणि आता कक्षेत पोहोचली असेल, तर पुढची पायरी कुठली असेल, याचा अंदाज बांधणे कठीण आहे. एक गोष्ट मात्र निश्चित आहे. अंतराळ जिंकण्याच्या शर्यतीपेक्षा अंतराळ वाचवण्याची शर्यत अधिक महत्त्वाची ठरणार आहे. जर आज आपण या अंतराळातील शस्त्रास्त्र स्पर्धेला आळा घातला नाही, तर उद्याचे आकाश चांदण्यांचे नसून क्षेपणास्त्रे आणि विध्वंसक उपग्रहांच्या सावल्यांचे असेल. विज्ञानाचा हा असा पराभव असेल, जिथे बुद्धिमत्तेने स्वतःच्याच विनाशाचा मार्ग प्रशस्त केला आहे. आज या क्षेत्रातील गुप्त स्पर्धा ही मानवजातीच्या नैतिकतेची अधोगती दर्शवते. शांततेच्या सुरातून सुरू झालेला मानवाचा अवकाश प्रवास जर युद्धाच्या घोषात संपणार असेल, तर यापेक्षा मोठी शोकांतिका कोणतीही असू शकत नाही. वेळेवर पावले उचलली नाहीत, तर हा 'अंतिम सीमांत' मानवाचा अखेरचा सीमांत ठरेल यात तीळमात्र शंका नाही.

## संपादकीय

**उठा, जागी व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थबकू नका**

### भरधाव वाहनांचा बेफाम वेग; निष्पाप जीवांच्या सुरक्षेचे काय?

रस्ते हे विकासाचे प्रतीक आहेत. शहरांपासून गावांपर्यंत दळणवळणाची साधने वाढली, वाहनांची संख्या वाढली, प्रवासाचा वेग वाढला; परंतु या वेगवान प्रवासासोबत सुरक्षिततेची भावना तितक्याच वेगाने वाढली आहे का, हा प्रश्न आज प्रत्येक नागरिकाला पडत आहे. पुण्यातील घोरपडी परिसरातील राष्ट्रीय युद्ध स्मारक चौकात घडलेल्या भीषण अपघाताने पुन्हा एकदा रस्ते सुरक्षेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणला आहे. भरधाव मिनी स्कूल बसने दुचाकीला धडक दिल्याने १६ वर्षीय रोहित लक्ष्मण कुदळे याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर त्याची १८ वर्षीय बहीण रिया गंभीर जखमी झाली. एका कुटुंबाच्या आयुष्यात दुःखाचा डोंगर कोसळिवणाऱ्या या घटनेने वाहनचालकांची जबाबदारी, वाहतूक नियमांची अंमलबजावणी आणि शालेय वाहनांच्या सुरक्षिततेविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. अपघात ही केवळ एका क्षणाची घटना असते; मात्र त्याचे परिणाम दीर्घकाळ कुटुंबाला भोगावे लागतात. एखाद्या कुटुंबातील मुलगा अकाली हिरावला जातो, आई-वडिलांच्या स्वप्नांचा चुराडा होतो आणि घरातील आनंदाचे वातावरण कायमच्या दुःखात बदलते. रस्त्यावरील निष्काळजीपणा केवळ अपघात घडवत नाही, तर अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त करतो. त्यामुळे रस्ते अपघातांकडे केवळ एक बातमी म्हणून पाहण्याऐवजी त्यामागील कारणांचा गांभीर्याने विचार करणे ही काळाची गरज आहे. वेगाची नशा आणि नियमांकडे दुर्लक्ष आज अनेक रस्त्यांवर वाहनांचा वेग वाढविण्याची स्पर्धा दिसून येते. काही वाहनचालकांना वेळेत पोहोचण्याची घाई असते, तर काही जण वेगालाच आपल्या वाहनचालक कौशल्याचे प्रतीक समजतात. मात्र वाहन चालविणे म्हणजे केवळ गंतव्यस्थानी पोहोचणे नव्हे; तर स्वतःसह रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवाची जबाबदारी स्वीकारणे होय. वाहतुकीचे नियम हे केवळ दंड आकारण्यासाठी तयार केलेले नाहीत. वेगमर्यादा, सुरक्षित अंतर, वाहतूक सिग्नल, योग्य दिशेने वाहन चालविणे आणि चौकात सावधगिरी बाळगणे या नियमांमागे मानवी जीवन सुरक्षित ठेवण्याचा उद्देश आहे. काही सेकंद वाचविण्यासाठी वेग वाढविणे किंवा नियमांकडे दुर्लक्ष करणे एखाद्याच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करू शकते. पुण्यातील अपघातात स्कूल बसचालकाने भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालविल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासणे आणि कायद्यानुसार जबाबदारी निश्चित करणे हे पोलिस व संबंधित यंत्रणांचे काम आहे. मात्र या घटनेतून मिळणारा व्यापक संदेश स्पष्ट आहे मोठे वाहन चालविणाऱ्या व्यक्तीने आपल्या वाहनाच्या आकाराची, वजनाची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या धोक्याची जाणीव ठेवली पाहिजे.

# टाटा कोणाला करणार 'टाटा'?




टाटा कोणाला टाटा करणार? हा प्रश्न अजून अनुत्तरित आहे. एकीकडे १५० वर्षांची मूल्ये आणि ट्रस्टची परंपरा, दुसरीकडे कायद्याचं राज्य आणि पारदर्शकतेची मागणी. टाटा समूह जो मार्ग निवडेल, तोच मार्ग भविष्यात भारतातील इतर मोठ्या व्यावसायिक घराण्यांसाठी आदर्श ठरेल.

टाटा सन्समधील वाद, ट्रस्टची रचना, कार्यक्षेत्र, समूहातील संस्थांचा सविस्तर आढावा आणि टाटा आता काय भूमिका घेणार याचा विचार करताना सर्वात प्रथम हे लक्षात घ्यायला हवं की टाटा हे फक्त कंपनीचं नाव नाही. हे भारताच्या औद्योगिक इतिहासाचं प्रतीक आहे. स्वातंत्र्यापूर्वीपासून आजपर्यंत टाटांनी विश्वास आणि गुणवत्ता यांचा वेगळा आदर्श निर्माण केला. देशाच्या विकासात टाटा समूहाचे योगदान अनन्यसाधारण आहे. पण अलीकडे याच घरात मोठी फूट पडली आहे. तसं पाहिलं तर प्रश्न साधा वाटतो टाटा सन्स पब्लिक कंपनी व्हावी की नाही? पण या प्रश्नात खूप काही दडलेलं आहे. कॉर्पोरेट गव्हर्नन्स, शेअरहोल्डरचे हक्क, ट्रस्टचं नियंत्रण, रिझर्व्ह बँकेचे नियम आणि नेतृत्वाचा संघर्ष हे सगळंच एकत्र आलं आहे. हा वाद केवळ एका कंपनीचा नाही, तर भारतातील ट्रस्ट आधारित व्यवसाय मॉडेलच्या भविष्याचा आहे.

टाटा साम्राज्याची रचना टाटा समूहाची रचना जगात वेगळी आहे. त्यात तीन स्तर आहेत. टाटा ट्रस्ट्स, टाटा सन्स आणि ऑपरेटिंग कंपन्या. टाटा ट्रस्ट्स हे एकाच ट्रस्टचे नाव नाही. हे अनेक चॅरिटेबल ट्रस्टचे एकत्रित नाव किंवा छत्रीसंस्था आहे. सर दोराबजी टाटा ट्रस्ट (सुमारे २७.९८%) आणि सर रतन टाटा ट्रस्ट (सुमारे २३.५६%) मिळूनच ५१.५४% हिस्सा आहे. तसंच इतर ट्रस्ट जसे जेआरडी टाटा ट्रस्ट (४.०१%), टाटा एज्युकेशन ट्रस्ट (३.७३%), टाटा सोशल वेल्फेअर ट्रस्ट (३.७३%), एम. के. टाटा ट्रस्ट आणि सर्वजनिक सेवा ट्रस्ट आदी मिळून एकूण ट्रस्ट हिस्सा सुमारे ६६% आहे. हे शेअर्स ट्रस्टच्या मालकीचे आहेत. नोएल टाटा, रतन टाटा किंवा इतर कुटुंबीय व्यक्तींकडे वैयक्तिक मालकी नाही. निर्णय ट्रस्टच्या विश्वस्तांच्या बोर्डाद्वारे घेतले जातात. नोएल टाटा सध्या टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष आहेत, तर टाटा सन्स ही होल्डिंग कंपनी आहे. टीसीएस, टाटा मोटर्स, टाटा स्टील, टाटा पॉवर या सर्व मोठ्या कंपन्यांमध्ये टाटा सन्सची मोठी मालकी आहे. मालक आणि व्यवस्थापन यांच्यात मतभेद झाले की कोणाचं ऐकायचं? शापूरजी पालनजी ग्रुपचा सुमारे १८.४% हिस्सा आणि टाटा ग्रुप कंपन्यांचा सुमारे १३% हिस्सा या रचनेत आणखी गुंतागुंत निर्माण करतो.

टाटा ट्रस्ट्सचे कार्यक्षेत्र ट्रस्ट्सचे काम केवळ देणगीपुरते मर्यादित नाही. ते पद्धतशीर आणि दीर्घकालीन बदल घडवतात. ट्रस्टची मुख्य क्षेत्रे आहेत आरोग्य, शिक्षण, पोषण, पाणी, स्वच्छता अशा बऱ्याच आघाड्यांवर टाटा ट्रस्ट कार्यरत आहे. उदाहरणच द्यायचं झालं तर आरोग्य विभागात टाटा कर्करोग उपचार टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबई आणि आसाममधील रुग्णालये, माता-बाल आरोग्य, क्षयरोग-मलेरिया नियंत्रण, मानसिक आरोग्य, वृद्धांची काळजी. नोएल टाटा यांनी ४०-५० ना-नफा रुग्णालये उभारण्याची योजना जाहीर केली आहे. यात क्रॉस-सबसिडी मॉडेल वापरले जाईल. जेणेकरून गुणवत्ता सर्वांना समान मिळेल. शिक्षण विभागात गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, आयआयएससी, टीआयएफआरसारख्या संस्थांना ऐतिहासिक पाठबळ, उच्च शिक्षणातील जागतिक दर्जाच्या संस्था उभारण्यावर आता अधिक भर आहे.

चंद्रशेखरन-नोएल टाटा संघर्ष टाटामधील नेमका वाद आरबीआयच्या २०१९ च्या आदेशाने सुरू झाला. मोठी मालमत्ता असलेली आणि मुख्यतः गुंतवणूक करणारी कंपनी अप्पर लेअर एनबीएफसी ठरते. यावरूनच ट्रस्टमध्ये फूट पडली. काहींचा लिस्टिंगला विरोध होता. एकदा पब्लिक झाली की ट्रस्टचे नियंत्रण कमी होईल, बाहेरील गुंतवणूकदारांचा दबाव येईल आणि टाटांची मूल्याधारित पद्धत धोक्यात येईल. असं त्यांना वाटत होतं ज्यात प्रमुख ट्रस्ट आणि नोएल टाटा होते, तर दुसऱ्या गटाला कायद्याचं पालन करायचं होतं. आरबीआय हा सर्वोच्च नियामक आहे, त्याच्या आदेशाला विरोध करणे म्हणजे कायद्याच्या विरोधात जाणे. असे या गटाला वाटत होते ज्यात प्रमुख एन. चंद्रशेखर होते. हे मतभेद नोएल टाटा आणि एन. चंद्रशेखरन यांच्यात वाढले. फेब्रुवारी २०२६ मध्ये चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीला नोएल टाटांनी विरोध केला. त्यासाठी लिस्टिंगबाबत वचन आणि नवीन व्यवसायांच्या नुकसानीबाबत स्पष्टता हवी अशी कारणे देण्यात आली होती. ऑगस्ट २०२६ मध्ये चंद्रशेखरन यांनी जाहीर केलं की ते फेब्रुवारी २०२७ नंतर पुनर्नियुक्तीसाठी अर्ज करणार नाहीत. ट्रस्टने हे स्वीकारलं. पण सप्टेंबर २०२६ मध्ये आरबीआयने सीआयसी नोंदणी रद्द करण्याचा अर्ज नाकारल्यानंतर बोर्डाने चंद्रशेखरन यांना आणखी पाच वर्षे अध्यक्ष म्हणून नियुक्त केले (४:१ मताने) आणि लिस्टिंगच्या दिशेने पावले उचलण्याचा निर्णय घेतला. ट्रस्टने याला 'बेकायदेशीर' आणि 'कायदेशीरदृष्ट्या अवैध' म्हटले. ट्रस्टच्या नियमांनुसार ट्रस्टच्या नॉमिनी संचालकांच्या बहुमताशिवाय अध्यक्ष नियुक्त करता येत नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे.

टाटा तोट्यात आहे की फायद्यात? टाटा समूह एकूण फायद्यात आहे. आर्थिक वर्षे २०२६ मध्ये एकत्रित महसूल ७.८% वाढून १६.२४ लाख कोटी रुपये आणि नफा ५१.९% वाढून १.७१ लाख कोटी रुपये झालाय. टाटा सन्सचा स्टँडअलोन नफा २१.८% वाढून ३१,९६१ कोटी रुपये झाला. पण कन्सॉलिडेटेड नफा सुमारे ३५-३८% घसरला, कारण एअर इंडिया सध्या दुप्पट तोट्यात आहे, टाटा डिजिटल आणि इतर अनलिस्टेड कंपन्यांमध्ये मोठे तोटे आहेत. लिस्टेड कंपन्या मात्र मजबूत नफा देतायत. संभाव्य परिणाम आणि मोठा धडा जर टाटा सन्स पब्लिक होते, तर त्यांचा आयपीओ येईल, पारदर्शकता वाढेल, पण ट्रस्टचं नियंत्रण थोडं कमी होईल. जर ट्रस्ट पर्याय शोधतो किंवा आरबीआयकडून वेळ मागतो, तर थोडा कालावधी मिळवून यात साधकबाधक चर्चा करून मार्ग काढता येईल किंवा रचनात्मक बदल करून शापूरजी पालनजी ग्रुपचा हिस्सा विकणे हा देखील पर्याय उपलब्ध आहे.


वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## वसंतराव नाईक हायस्कूल जरुड येथे

# न्यू इंग्लिश स्कूल येथील खेळाडूंनी स्पर्धेमध्ये विजय मिळवला






**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

**वरुड** - येथुन जवळच असलेल्या जरुड येथील वसंतराव नाईक हायस्कूल येथे आयोजीत तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये स्थानिक न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथील खेळाडूंनी विविध स्पर्धामध्ये विजय मिळविला.

